सकाळ

# सांगलीत उद्यापासून मध्यवर्ती युवा महोत्सव

## सलग तीन दिवस पर्वणी; पहिल्या तीन विजेत्यांचा महोत्सवात समावेश

**कोल्हापूर, ता. २९ :** येथील महावीर महाविद्यालयात झालेल्या शिवाजी विद्यापीठाच्या ३८ व्या युवा महोत्सवाला विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला. बुधवारपासून (ता. ३१) सांगलीतील विलिंग्डन कॉलेज येथे सलग तीन दिवस मध्यवर्ती युवा महोत्सव होणार असून, पहिल्या तीन विजेत्या स्पर्धकांचा या महोत्सवात समावेश असेल. जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचा निकाल काल जाहीर झाला आहे.

### सविस्तर निकाल असा...

- **मराठी वक्तृत्व :** डी. आर. माने कॉलेज (कागल), दूधसाखर महाविद्यालय (बिद्री), राजाराम महाविद्यालय (कोल्हापूर).
- **हिंदी वक्तृत्व :** जयसिंगपूर कॉलेज, गोखले कॉलेज (कोल्हापूर), राजर्षी शाहू कॉलेज (रुकडी).
- **इंग्रजी वक्तृत्व :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज (पेठवडगाव), दूधसाखर (बिद्री), सर्व अधिविभाग (शिवाजी विद्यापीठ).
- **वादविवाद :** न्यू कॉलेज, विवेकानंद कॉलेज, दूधसाखर (बिद्री).
- **लोककला :** दत्ताजीराव कदम कॉलेज (इचलकरंजी), सदाशिवराव मंडलिक कॉलेज (मुरगूड), शरद इन्स्टिट्यूट (यड्राव).
- **लोकनृत्य :** आजरा महाविद्यालय, शिव शाहू (सरूड), विवेकानंद कॉलेज.
- **लोकवाद्यवृंद :** विवेकानंद, आजरा महाविद्यालय, कॉमर्स कॉलेज.
- **समूहगीत :** सर्व अधिविभाग (शिवाजी विद्यापीठ), विवेकानंद, कॉमर्स कॉलेज.
- **नकला :** यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, आजरा महाविद्यालय, विवेकानंद कॉलेज.
- **एकांकिका :** शरद इन्स्टिट्यूट, विवेकानंद कॉलेज, दत्ताजीराव कदम कॉलेज (इचलकरंजी).
- **लघुनाटिका :** विवेकानंद, भारती विद्यापीठ, न्यू कॉलेज.
- **पथनाट्य :** डॉ. घाळी कॉलेज (गडहिंग्लज), भोगावती कॉलेज, कॉमर्स कॉलेज.



- **मूकनाट्य :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज (पेठवडगाव), विजयसिंह यादव कॉलेज (पेठवडगाव), श्रीमती आक्काताई पाटील कन्या महाविद्यालय (इचलकरंजी).
- **सुगम गायन :** राजाराम कॉलेज, विवेकानंद कॉलेज, आजरा महाविद्यालय.

Kolhapur, Kolhapur-Today
30/10/2018 Page No. 3

30 OCT 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एस. के. पाटील महाविद्यालय उपविजेता



कुरूंदवाड : व्हॉलीबॉल स्पर्धेत उपविजेतेपद पटकालेला एस. के. पाटील महाविद्यालयाचा संघ

## शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय व्हॉलीबॉल स्पर्धेत यश

प्रतिनिधी
कुरूंदवाड

सहकाररभुषण एस. के. पाटील महाविद्यालयाच्यावतीने व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत कोल्हापूर, सांगली व सातारा या जिल्ह्यातील प्रत्येकी चार संघानी भाग घेतला होता.

या स्पर्धेचे उद्‌घाटन जावेद बागवान, भारतीय व्हॉलीबॉल संघटनेचे सहसचिव प्रा. बाळासाहेब सूर्यवंशी, प्राचार्य डॉ. टी. के. जाधव यांच्या हस्ते व अक्षय आलासे, संजय खोत, बाबासो सावगावे, वैभव उगळे, प्रा. सावगावे यांच्या उपस्थित करण्यात आले.

स्पर्धेमध्ये अंतिम सामना यजमान एस. के. पाटील महाविद्यालय व देवचंद महाविद्यालय अर्जुननगर यांच्यामध्ये झाला. यामध्ये देवचंद महाविद्यालयाने चुरशीच्या सामन्यात एस. के. पाटील महाद्यिालयावर मात केली. पण चिवट व निकराची झुंज एस. के. पाटील महाविद्यालयाने देवून प्रेक्षकांच्या डोळ्याचे पारणे फेडले.

स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ आमदार उल्हास पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. या स्पर्धेतून दिल्ली येथे होणाऱ्या खेलो इंडिया व बरकुतुल्ला विद्यापीठ भोपाळ येथे होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी तसेच मुंबई येथे होणाऱ्या महाराष्ट्र राज्य क्रिडा महोत्सवासाठी शिवाजी विद्यापीठाचा संघ निवडला गेला आहे. निवड समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. प्रा. सुनिल चव्हाण तर सदस्य म्हणून इस्लामपूरचे प्रा. संदीप पाटील व प्रा. राहुल इंगळे यांनी काम पाहिले. स्पर्धा विद्युत झोतात खेळविण्यात आल्या. सदर स्पर्धा पार पाडण्यासाठी डॉ. प्रा. सुनिल चव्हाण, प्रा. संजय पाटील, प्रकाश आंबी, अमर कबाडे, अर्जुन पाटील, साहिल मोमीन, शहानवाज मोमीन यांच्यासह स्पोर्टस क्लबच्या सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.